# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक १९.०३.२०१८ रोजी (दिनांक १५.०२.२०१८ रोजीची तहकुब सभा, का.प.क्र.०७) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सायंकाळी ७.०० वा. सभेला सुरुवात झाली. मा.अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १७. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १८. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १९. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| २०. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २१. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २२. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २३. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २४. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २५. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २६. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २७. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २९. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| ३०. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३१. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३२. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३३. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३४. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३५. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३६. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३७. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३८. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४१. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४२. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४३. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४४. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४६. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५१. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५२. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५३. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५५. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५८. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६१. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६२. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६३. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६४. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६६. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६७. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६८. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७२. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७३. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७४. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७५. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७६. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७७. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७८. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७९. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८०. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८१. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८२. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८३. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८४. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८५. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८६. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८७. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८९. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९०. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९१. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९२. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९३. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९४. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९५. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

मा.महापौर :आताच कार्यक्रम पत्रिका ०९ ची सभा संपन्न झाली आहे. आता कार्यक्रम पत्रिका ०७ मधील जे स.सदस्यांचे, लेखाशिर्ष बदलाच, अंदाजपत्रकाचे व इतर प्रस्ताव मंजुर करण्यात येते. पुढील सभेत विषय क्रमांक-३९३ हा विषय व प्रश्न घेण्यात येतील.

**विषय क्रमांक ३१९:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ३२०:-** **(कार्यकारी अभियंता-१,२,३ व ८)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शासन निर्णयाच्या धोरणानुसार (परिपत्रक) त्याची अंमलबजावणी करणेसाठी व सुशिक्षीत बेरोजगार, अंध/अपंगांना महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या जागा भाडे तत्वावर देणेसाठी पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सततची मागणी व पाठपुरावा असतो. यामुळे महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत वाढविणे व महानगरपालिकेची सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीकोनातुन खालील नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा. तसेच मा.सर्वसाधारण सभेने यापूर्वी औरंगाबाद शहरामध्ये विविध ठिकाणी असलेल्या गटाई कामगारांना पिच परवाने देणेसाठी अशासकीय ठराव घेतलेला आहे. महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला रस्ता बाधित न होता व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन न होता त्याअनुषंगाने धोरणात्मक निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवावयाचा प्रस्ताव खालील प्रमाणे.

- औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये रस्त्या लगत बसून चामड्याच्या वस्तु, पादत्राने दुरुस्त करणाऱ्या गटई कामगारांना बैठे परवाना (पिच परवाने) देणेसाठी शासनाने निर्णय दिलेला आहे. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, या अटीस अधीन राहून त्यांच्याकडून सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे भाडे आकारणी करून पिच परवाने देणेसाठी व तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी असलेल्या अनाधिकृत जसे की, रस्त्यालगत असलेल्या हातगाड्या, टपऱ्या यांच्याकडून सुध्दा मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, या अटीस अधीन राहून त्यांच्याकडून सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे ते वापरत असलेल्या जागेचे भाडे भरणा करून भाडे पावतीवर अनाधिकृत वापर असा शिक्का मारून भाडे भरणा करून घेऊन त्यापासून महानगरपालिकेस आर्थीक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.
- औरंगाबाद महानगरपालिकेने यापूर्वी शहरामध्ये विविध ठिकाणी असलेल्या हातगाड्यांसाठी सन २००७ मध्ये हातगाड्यांना परवाना दिलेला होता. त्यावेळेच्या परवानानुसार अंदाजे ४० ते ५० हजार हातगाड्या आहेत. अशा हातगाड्या धारकांकडून प्रती हातगाडी परवानासाठी रु.५००/- ची आकारणी केल्यास अंदाजे २ ते २.५ कोटी रुपयेचे आर्थिक उत्पन्न महानगरपालिकेस मिळेल अशा हातगाडी धारकांकडून परवाना शुल्क वसूल करणेसाठी एजन्सी नियुक्त करणे व जोपर्यंत

हॉकर्स झोनची कार्यवाही पूर्ण होत नाही. तोपर्यंत त्याची अंमलबजावणी करणे, ज्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल.

- औरंगाबाद शहरामध्ये विविध ठिकाणी असलेले एकूण ०७ उड्डाणपुल असून त्याखाली असलेल्या जागेत अनाधिकृतपणे व्यवसाय करण्यात येत असल्याने व अनाधिकृतपणे वाहने उभे करून त्या जागेचा अनाधिकृतपणे वापर करीत आहे. अशा ठिकाणी प्रायोगिक तत्वावर वाहनतळे व हातगाड्या (हॉकर्स) साठी जागा उपलब्ध करून व वाहनतळासाठी जागा उपलब्ध करून दिल्यास त्यापासून सुध्दा महानगरपालिकेस अंदाजे रु.१० लक्ष उत्पन्न मिळू शकेल.
- औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये रस्ता बाधीत जागा सोडुन असलेल्या जागेत अंध/अपंग यांच्यासाठी स्वयं रोजगारासाठी, निराधार, सुशिक्षीत बेरोजगार यांना शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अटी शर्तीनुसार जागा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही. या अटीस अधीन राहून जागा भाडेतत्वावर दिल्यास शासन निर्णयाची अंमलबजावणी व त्यापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल व महानगरपालिकेची सामाजिक बांधीलकी पार पडेल. करीता वरील प्रमाणेचा धोरणात्मक निर्णयासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार, अंध, अपंग, गटई कामगार, हातगाड्या आणि टपऱ्या तसेच उड्डाणपुलाखाली वाहनतळ तसेच हातगाड्यासाठी महानगरपालिकेच्या अटी व शर्ती नुसार तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही या अटीस अधीन राहून स्वयंरोजगारासाठी जागा भाडेतत्वावर देणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.

१. महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यालगत बसून चामड्याच्या वस्तु, पादत्राणे दुरुस्त करणाऱ्या गटई कामगारांना शासननिर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही. महानगरपालिकेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून रेडी रेकनर दराने भाडे आकारणी करून परवाना देण्यास मंजुरी देण्यात येते. अनाधिकृत जागा वापरत असलेल हातगाड्या, टपरीधारक यांचेकडून रेडी रेकनर दराने भाडे वसुली करणे व पावतीवर अनधिकृत वापर असा शिक्का मारून भाडे भरणा करून घेणेस मान्यता देण्यात येते.

२. शुल्क वसुलीसाठी एजन्सी नियुक्त करणे व हातगाड्यांना परवानगी देण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे. परंतू शासनाचे निर्णयाप्रमाणे हॉकर्स झोन निर्मान करणे हे महापालिकेचे काम आहे. प्रथम हॉकर्स झोन तात्काळ घोषित करावेत. त्यानंतर हातगाडी परवानगी देणे बाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व शासनाच्या निर्देशानुसार समिती स्थापन करणे आवश्यक आहे. प्रथम समिती स्थापन करण्याची कार्यवाही करावी. समितीच्या माध्यमातून हातगाड्यांना परवाने देण्याबाबत असलेले निर्देश तपासून घ्यावेत. रस्त्यावर कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत हातगाड्या लागणार नाहीत याची प्रशासनाने काळजी घ्यावी. अतिक्रमण हटाव पथकामार्फत अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करण्यात यावी. हॉकर्स झोन निर्माण होईपर्यंत अनधिकृत हातगाड्यांना पर्यायी जागेची व्यवस्था करून द्यावी.

३. शहरात असलेल्या सात उड्डाणपुलाखाली अनधिकृत वाहनतळास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने प्रायोगीक तत्वावर फक्त वाहनतळासाठी शुल्क आकारणी करून जागा देण्याबाबत सर्व कायदेशीर बाबी तपासून प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.
४. विकास योजना रस्ताबाधित जागा सोडून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही या अटीस अधीन राहून शासननिर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता अंध, अपंग यांच्या स्वयंरोजगारासाठी आणि निराधार सुशिक्षित बेरोजगार यांना महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार जागा भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ३२१:-</u>** **(आरोग्य वैद्यकीय अधिकारी)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, दिनांक १९.०८.२०१७ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसमोर विषय क्रमांक-११९९ नुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व योग्य निर्णयास्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव पुन:श्च मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येतो.

महानगरपालिकेच्या विशाल मार्केट रेल्वेस्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९७ दिनांक ३१.०८.२००८ व मा.स्थायी समिती ठराव क्र.१२७ दिनांक २७.०८.२००९ नुसार बी.ओ.टी.तत्वावर मल्टी डायग्नोस्टीक सेंटर (सिटी स्कॅन, एक्स-रे, मॅमोग्राफी, पॅथॉलॉजी लॅब इत्यादी) में.तापडिया डायग्नोस्टीक सेंटर तर्फे सुरु करण्यात आले आहे. सदरील संस्थेसोबत दिनांक २९.०८.२००९ रोजी करारनामा (Lease Deed) करण्यात आलेला होता. तसेच कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आरोग्य/२०१०/१७० दिनांक २४.०२.२०१० नुसार कार्यादेश देण्यात आलेले होते. सदरील करारनामा ७ वर्षाकरीता करण्यात आलेला होता. (दिनांक ०१.०९.२००९ ते दि.३१.०८.२०१६)

सदरील करारनाम्यात खालील प्रमाणे मुख्य अटी व शर्ती होत्या (Lease Deed):-

- करारनामा ७ वर्षाकरिता होता. (दिनांक ०१.०९.२००९ ते दिनांक ३१.०८.२०१६)
- कार्यादेश जा.क्र.मनपा/आरोग्य/२०१०/१७० दिनांक २४.०२.२०१० अन्वये रु.१५०००/- व न्युक्लीअर स्कॅन व ओपीडी सर्व्हीस याकरीता रु.५०००/- प्रतिमाह महानगरपालिकेस देण्यात येतात व १२ टक्के रॉयल्टी.
- नियमाप्रमाणे TDS कपाती आयकर नियम १९६१ नुसार करण्यात येते.
- रॉयल्टी व भाडे अदा न केल्यास डिपॉझीट मधून वसुल करण्यात येईल.
- अद्यावत साहित्य व उपलब्ध करून देण्यात यावे उदा.एक्स-रे, सीटी स्कॅन, एमआरआय, मेमोग्राफी, सोनोग्राफी मुद्दा क्र.१० नुसार.
- उच्च दर्जाचे साहित्य वापरण्यात यावे.
- फर्निचर व आवश्यक दुरुस्त्या करण्यापूर्वी परवानगी घ्यावी. याबाबत स्वत: संस्थेने खर्च करावा.
- मार्केट दरापेक्षा २० टक्के कमी दर असावेत.
- जेष्ठ नागरिक, अपंग मनपा शासकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती, स.नगरसेवक, मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केल्यानंतर १० टक्के सुट देण्यात यावी.
- तज्ञ डॉक्टर व कर्मचारी संस्थेने उपलब्ध करून द्यावेत.
- विविध प्रकारच्या एन.ओ.सी.संस्थेने स्वत: उपलब्ध करून घ्याव्यात.
- सुविधा व दराबाबत केव्हाही पाहणी मनपातर्फे करण्यात येईल.

- आरोग्य वैद्यकीय अधिकारी व्यवस्थापन समितीमध्ये सदस्य राहतील.
- इतर आवश्यक दुरुस्त्या, विद्युत देयक, पाणी देयक संबंधीत एजन्सीने करावी.
- सुरक्षा अनामत रु.१० लक्ष राहील. यावर कुठल्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

सदरील Lease Deed चा कालावधी हा दिनांक ३१.०८.२०१६ रोजी संपुष्टात आलेला आहे. यानंतर मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या आदेशान्वये करारनामा नुतनीकरण करण्यासाठी मार्च-२०१७ मध्ये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

१. मुख्य लेखापरिक्षक - अध्यक्ष
२. मुख्य लेखाधिकारी - सदस्य
३. विधी सल्लागार - सदस्य
४. तांत्रिक कक्ष प्रमुख - सदस्य
५. आरोग्य वैद्यकीय अधिकारी - सदस्य सचिव

करारनामा नुतनीकरणाच्या अनुषंगाने दिनांक १५.०३.२०१७ व दिनांक ०९.०५.२०१७ रोजी सदरील समितीच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत. सदरील गठीत समितीने शिफारस केल्यानुसार में.तापडीया डायग्नोस्टीक सेंटर सोबत नुतनीकरण करतांना एकुण ८३८.५० स्के.मीटर क्षेत्रफळ असलेली जागा रु.२६३७०८/- प्रतिमाह रेडिरेकनरनुसार भाडे आकारण्याची शिफारस केलेली आहे.

गठीत समितीने याबाबत संबंधीत संस्थेस दिनांक ०९.०५.२०१७ बैठकीस बोलविण्यात आलेले होते. सदरील बैठकीस श्री.जुगलकिशोर तापडिया हे उपस्थित होते. त्यांना रेडिरेकनर दराने करारनामा नूतनीकरण करण्याबाबत विचारणाबाबत करण्यात आली.

मे.तापडिया डायग्नोस्टीक, औरंगाबाद हे करार संपुष्टात आल्या नंतरही आजमितीस सुरु आहे. करारनामा नुतनीकरण न झाल्यामुळे डायग्नोस्टीक सेंटर सिल का करण्यात येऊ नये? याबाबत जा.क्र.मनपा/आरोग्य/८८८/२०१७ अन्वये दिनांक ०२.०६.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती व त्याचा खुलासा मा.आयुक्त यांना समक्ष सादर करण्यास आदेशित करण्यात आले होते. त्यावर मा.आयुक्तांकडे त्यांनी खालील प्रमाणे खुलासा सादर केला आहे.

| अ क्र | **में.तापडिया डायग्नोस्टीक सेंटर यांनी दि.०३.०६.२०१७ रोजी सादर केलेला कारणे दाखवा नोटीसचा खुलासा** | **प्रशासनाचे मत** |
|---|---|---|
| १. | तापडिया डायग्नोस्टीक सेंटर हे सिटी स्कॅन व न्युक्लीयर स्कॅन सोडून इतर मशिनरी मनपाला हस्तांतरीत करण्यास तयार आहेत. तसेच डायग्नोस्टीक सेंटरचे नाव जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तापडिया डायग्नोस्टीक सेंटर असेच राहील व डायग्नोस्टीक सेंटर स्वत: चालवावे व इतर कोणालाही हस्तांतरीत करू नयेत व चालविण्याकरीता देऊ नये असे नमूद केलेले आहे. | • संदर्भीय Lease Deed नुसार अशी अट लागु होत नाही. या प्रकारची अट संबंधीताने लादणे योग्य नाही. मनपाची जागा असल्याने प्रथम अधिकार महानगरपालिकेचा आहे. Tender च्या “fair practices” मधे हे मोडत नाही. तसेच सदरील संस्थेची यंत्र सामुग्रीबाबत महानगरपालिकेचे कसल्याही प्रकारचे दायित्व (Labiality) नाही. पत्रामध्ये नमूद मुद्दा क्र.१ ही अट मान्य करता येणार नाही. |
| २. | जर रेडीरेकनर दराने भाडे आकारणी करणार | • गरीब गरजु व्यक्तींना याचा फायदा |

| | | |
|---|---|---|
| | असाल तर आम्हाला सदरील भाडे परवडणारे नाही. जर रेडीरेकनर दराने भाडे आकारणी करत असाल तर पब्लीक प्रायव्हेट लिमीटेड कंपनीद्वारे चालवू व औरंगाबाद महानगरपालिका हे नाव काढून टाकू. सवलतीच्या दरात वैद्यकीय चाचण्या करता येणार नाही. तसेच व्यापारी पध्दतीने दर लावून व यामध्ये कुठल्याही प्रकारची सवलत देणार नसल्याचे तापडिया डायग्नोस्टीक सेंटर यांनी नमुद केलेले आहे. | होण्याकरीता डायग्नोस्टीक सेंटर सुरु करण्यात आलेले आहे. जर कमर्शियल दराने सेवा देणार असेल तर मनपाला अधिक स्पर्धक मिळू शकतात. या प्रकारची अट संबंधीताने लादणे योग्य नाही. या सेवेचा मुळ उद्देशाचा भंग होत आहे. यामुळे पत्रामध्ये नमुद मुद्दा क्र.०२ ही अट मान्य करता येणार नाही. |
| ३. | दिनांक २९.०८.२००९ रोजी केलेल्या करारनाम्यानुसार कराराचे नूतनीकरण करून देण्यात यावे. तसेच रॉयल्टी व भाडे परवडणारे नाही. नूतनीकरण करतांना एकत्रित भाडे रु.५००००/- दरमहा या दराने आकारून द्यावेत अशी विनंती केलेली आहे. मागील सवलत पुर्वीप्रमाणे ठेवू. तसेच आणखी काही तपासण्या जास्त सवलतीच्या दरात देऊ तसेच वर्षातून एकदा औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करु असे नमुद केलेले आहे. | • मा.सर्वसाधारण सभा दि.२०.०२.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त मंजुरीनूसार व स्थायी समितीच्या मंजुरीनुसार भाडे आकारण्यात येते व वसुली करण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार बाजार मुल्यापेक्षा मनपाच्या कोणत्याही जागा (RR दरापेक्षा) कमी दराने भाड्याने देण्यात येऊ नये. व मनपाचे उत्पन्न वाढणेसाठी व Principle of Law प्रमाणे पुर्वी कमी दराने दिलेल्या मनपाचे मिळकती भाड्याने दिलेल्या आहेत. त्यांना आतापासून रेडीरेकनर दराने भाडे आकारणी करणे याप्रमाणे योग्य राहील. सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेऊन मंजुरी घेण योग्य. तापडिया डायग्नोस्टीक सेंटर यांना ८३८.५० स्के.मीटर क्षेत्रफळ असलेल्या जागेकरीता रेडिरेकनर दरानुसार रु.२,६३,७०८/- प्रतिमाह भाडे आकारणे योग्य वाटते. पत्रामध्ये नमुद केलेला मुद्दा क्र.३ ही अट मान्य करता येणार नाही. |

त्यामुळे मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मनपापुढे खालील पर्याय उपलब्ध आहेत.

**अ)** १. सदरील Lease Deed दस्ताऐवजी नोंदणी कायद्यांतर्गत रजिस्टर न झाल्याने त्याची वैधता संपुष्टात आली आहे. पुर्वीचे Lease Deed रद्द करून नव्याने रेडिरेकनर दराने म्हणजेच रु.२६३७०८/- प्रतिमाह भाडे या दराने मे.तापडिया डायग्नोस्टीक सेंटर यांच्या बरोबर Lease Deed करणे.

२. मे.तापडिया यांचे Lease Deed रद्द करून नव्याने Expression of Interest Call करणे.

**ब)** Lease Deed संपल्यानंतर आजपर्यंत में.तापडिया डायग्नोस्टीक सेंटर यांनी संबंधीत जागेचा करारनामा नूतनीकरण न करता वापर केल्यामुळे माहे सप्टेंबर २०१६ ते आजपर्यंत रेडिरेकनर दरानुसार भाडे व १२ टक्के रॉयल्टी वसूल करणे योग्य होईल.

वरील प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला असता, त्याबाबत निर्णय झालेला नाही. दिनांक ०३.०६.२०१७ रोजी विश्वस्त, मे.तापडिया डायग्नोस्टिक सेंटर, युनिट ऑफ जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांनी दिलेल्या पत्रात जर रेडिरेकनर प्रमाणे दर लावले तर सवलतीचे दर व मनपाचे नाव वगळण्याच्या अटीवर रेडिरेकनर संबंधीतास मान्य असल्याचे नमुद केले आहे. ही बाब धोरणात्मक असून लोकहिताशी संबंधीत असल्याने प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व योग्य त्या निर्णयास्तव पुन:श्च सादर.

**संवाद:-**

श्री.गजानन बारवाल, :लोकसेवेच्या दृष्टीने संस्थेमार्फत वैद्यकीय सेवा मार्केटमधील प्रचलित दरापेक्षा कमी दरामध्ये पुरविण्यात येत असून या सेंटरला चॅरिटेबल ट्रस्टच्या नांवासोबत महानगरपालिकेचे नांव लावण्यात आलेले आहे. स.पदाधिकारी, आयुक्त यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना बिलामध्ये काही प्रमाणात सुट देण्यासंबंधीची अट करारनाम्यात समाविष्ट करावी.

श्री.विकास जैन :महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड या ठिकाणी सुरु असलेल्या डायग्नोस्टीक सेंटरच्या कराराची मुदत दि.३०.०८.२०१६ रोजी पर्यंत होती. महानगरपालिकेस रु.२०,०००/- आणि १२% रॉयल्टी प्रतिमाह देण्यात येते. मार्च-२०१७ पर्यंत रु.६६,२९,२४८/- इतका महसुल महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

प्रतिमहा रु.९८,०००/- महानगरपालिकेस महसुल मिळत आहे. मार्केट मधील प्रचलित दरापेक्षा २०% कमी दराने वैद्यकीय सेवा पुरविली जाते. त्यांच्या करारनाम्यातील अटी, शर्ती नुसार महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीनुसार रॉयल्टी मध्ये १% वाढ करून मुदतवाढ देण्याचे नमूद केलेले आहे. मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना २०% सवलत देण्यात यावी. स.नगरसेवक यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना १०% सवलत देण्यात यावी, महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कॅम्प आयोजित करून मोफत आरोग्य तपासणी करावी. या अटींचा समावेश करुन दुरुस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. तसेच पुढील १५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

श्री.प्रमोद राठोड :दिनांक ०९.०५.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७६० नुसार ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

मा.महापौर :स.सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे अटी शर्तीचा समावेश करावा. प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीवनबाई तापडीया चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेतर्फे तापडीया डायग्नोस्टीक सेंटर चालविण्यात येत असून आरोग्यविषयक चाचण्या कमी दरामध्ये करून देण्याचे काम या सेंटरमध्ये केले जाते. सदरील बाब व्यापक लोकहिताशी निगडीत असून सेवाभावी वृत्तीने सदरचे

डायग्नोस्टीक सेंटर चालविण्यात येत असल्याने स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सुधारणांचा समावेश करून पुढील कालावधीसाठी संबंधीत संस्थेस मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

१. महानगरपालिकेचे मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना २०% सवलत देण्यात यावी.
२. महानगरपालिकेचे स.नगरसेवक यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना १०% सवलत देण्यात यावी.
३. महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कॅम्प आयोजित करून मोफत आरोग्य तपासणी करावी.

या अतिरिक्त अटींचा समावेश करारनाम्यामध्ये करण्यात यावा. त्याचप्रमाणे दिनांक ०९.०५.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७६० ची अंमलबजावणी करावी. करारनाम्यातील अटी-शर्तीच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथील जागेत सुरु असलेल्या तापडीया डायग्नोस्टीक सेंटरला स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार व चर्चेनुसार पुढील कालावधीसाठी सुधारित करारनामा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२२:-</u>** **(कार्य.अभि.पाणीपुरवठा)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध वसाहतींना साठवण क्षमता अपुरी असल्यामुळे गुरुत्व पध्दतीने पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे पाणी पुरवठ्याचे टप्पे वाढून पाणी पुरवठ्याचा कालावधी वाढत आहे. तसेच नागरीकांना अतिशय कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. समांतर जलवाहिनीच्या संकल्पनानुसार शहरात विविध ठिकाणी जलकुंभ बांधणे प्रस्तावीत होते. त्यापैकी वॉर्ड क्र.३५ नारेगाव, मसनतपुर, ब्रिजवाडी या वसाहतींसाठी गरवारे क्रिडा संकुल परिसरात २० लक्ष लिटर्स क्षमतेचा, २५ मी.स्टेजींग हाईट असलेला आर.सी.सी.जलकुंभ प्रस्तावित करण्यात आलेला होता.

सद्यस्थितीत उपरोक्त नमुद भागांना एन-५ जलकुंभावरून पंपींगद्वारे टप्प्या-टप्प्याने पाणी पुरवठा करण्यात येतो. यासाठी सुमारे ८ ते ९ तासांचा कालावधी लागतो. यावर उपाययोजना करण्यासाठी समांतर जलवाहिनी प्रकल्पाचे संकल्पना नुसार गरवारे स्टेडियम परिसरात २० लक्ष लिटर्स क्षमतेचा, २५ मी.स्टेजींग हाईट असलेला आर.सी.सी.जलकुंभ बांधण्याचे अंदाजपत्रक र.रु.१,५५,४१,६९८/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुची सन २०१६-१७ नुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष "शहरामध्ये आवश्यकतेनुसार पाण्याच्या टाक्या बांधणे व इतर कामे करणे" साठी रु.५०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे. त्या तरतुदींमधून सदर कामाचा खर्च भागविण्यात येईल.

प्रस्तावीत जलकुंभ भरण्यासाठी सिडको एन-५ ते प्रस्तावीत जलकुंभापर्यंत जलकुंभ भरणारी वाहिनी व वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिन्या टाकण्याची व्यवस्था भविष्यात करावी लागणार आहे. त्यासाठी आगामी अर्थसंकल्पात निधी उपलब्ध झाल्यानंतर स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

करीता, गरवारे स्टेडियम परिसरात २० लक्ष लिटर्स क्षमतेचा, २५ मी.स्टेजींग हाईट असलेला आर.सी.सी जलकुंभ बांधण्याचे अंदाजपत्रक र.रु.१,५५,४१,६९८/- चे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरवारे स्टेडियम परिसरात २० लक्ष लिटर्स क्षमतेचा, २५ मी.स्टेजींग हाईट असलेला आर.सी.सी. जलकुंभ बांधण्याच्या कामाचे र.रु.१,५५,४१,६९८/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२३:-** **(कार्य.अभि. ४ ते ७ व ९)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०२ मधील भगतसिंगनगर रस्ता ते म्हसोबानगर मंदिर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४८,५२,१२६/-च्या ढोबळ अंदाजपत्रकास (Line Estimate) प्रशासकीय मान्यता तसेच दि.०३.०९.२०१४ (का.प.क्र.०६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.६७ नुसार ठराव घेऊन सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे दि.२७.०२.२०१५ (का.प.क्र.१२) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीमध्ये ठराव क्र.११० अन्वये मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% कमी दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केल्यानुसार वॉर्ड क्र.०२ मधील भगतसिंगनगर ते म्हसोबानगर मंदिर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण करणे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.७५,७९,०८८/- चे तयार करण्यात आले आहे. सुधारीत अंदाजपत्रकामध्ये र.रु.१५,३१,४००/- च्या वाढीव बाबी तसेच र.रु.४,०९,८७३/- च्या अतिरिक्त बाबीचा समावेश करण्यात आला आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची सन २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात स्पील ओव्हर कामाच्या यादीत वॉर्ड-०४ स्पिल, पान क्र.८४, अ.क्र.०१ रु.७५.०० लक्ष या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता उक्तनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७५,७९,०८८/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव तसेच सदरील वाढीव तसेच अतिरिक्त बाबीचे काम याच कामाचे कंत्राटदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.००% कमी दराने करून घेणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०२ मधील भगतसिंगनगर ते म्हसोबानगर मंदिर व भगतसिंगनगर रस्ता ते मयुरपार्क पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.७५,७९,०८८/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास (रु.१५,३१,४००/- च्या वाढीव बाबी व रु.४,०९,८७३/- च्या अतिरिक्त बाबींचा समावेश असलेले) मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील वाढीव तसेच अतिरिक्त बाबीचे काम या कामाचे कंत्राटदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दरापेक्षा ३.००% कमी दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२४:-** **(कार्य.अभि.१,२,३ व ७)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४२, किराडपुरा अंतर्गत राम मंदिर ते पटेल हॉटेल पर्यंत रस्ता White Topping करणे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.९९,९०,०२९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक सादर करतांना सदरील लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद वाढ करणे बाबत लेखा विभाग कार्यवाही करतील.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु.९९,९०,०२९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४२, किराडपुरा अंतर्गत असलेल्या राम मंदिर ते पटेल हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे White Topping करणेच्या कामाचे र.रु.९९,९०,०२९/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२५:-** **(कार्य.अभि.पाणीपुरवठा)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्रमांक-७ मयुरपार्क अंतर्गत कार्तिकनगर व त्यालगत असलेल्या अधिकृत व अनाधिकृत वसाहतीस सद्याच्या स्थितीत पाणी पुरवठा सुरु झालेला नाही. सदरच्या वसाहतीमधील काही नागरीकांनी ३०० ते ५०० फुटापर्यंत खुप अंतरापर्यंत नळ कनेक्शन घेतलेली आहे. सदरचे कनेक्शन अभय योजनेअंतर्गत समांतरकडे अधिकृत करण्यात आल्याचे समजते. या भागात नवीन जलवाहीनी टाकल्यानंतर कमीत कमी १.२ एम.एल पाण्याचे परिमाण लागणार आहे. सद्याच्या स्थितीत वाढीव परिमाण मिळणार नाही. त्यामुळे या भागास पाणी पुरवठा करता येणार नाही. समांतर प्रकल्पाचे काम झाल्यानंतर पाण्याचे परिमाण वाढल्यानंतर पाणी पुरवठा करणे शक्य होईल किंवा संपुर्ण शहराचा व सिडकोचा पाणी पुरवठा दोन दिवस ऐवजी तीन दिवस आड केल्यास नवीन मयुरपार्क व त्यालगतच्या भागास पाणी पुरवठा करता येऊ शकेल. अशा ठिकाणी सद्याच्या स्थितीत ३०० व २०० मी.मी.ए.सी. व सी.आय. जलवाहिन्या अस्तित्वात आहे. ज्या ठिकाणी ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच ३०० मी.मी. व्यासाची ए.सी.पाईप लाईन ही लांबच्या अंतरावरुन असल्याने पाणी पुरवठा कमी होतो. त्या ऐवजी कमी अंतरावरून ३०० मी.मी.व्यासाची डी.आय.पाईप लाईन प्रस्तावीत आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

त्यानुसार विस्तृत सर्वेक्षण करून वॉर्ड क्रमांक-७ मयुरपार्क अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणी १००,१५० व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ व ९ जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.७०,६२,४८०/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामासाठी लागणारी तरतुद ही सन २०१७-१८ या लेखाशिर्षकातून करण्यात आलेली आहे.

तरी वार्ड क्रमांक-७ मयुरपार्क अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणी १००,१५० व ३०० मी.मी.व्यासाच्या डी.आय.के.-७ आणि डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.७०,६२,४८०/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक-७ मयुरपार्क अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणी १००,१५० व ३०० मी.मी.व्यासाच्या डी.आय.के.-७ आणि डी.आय.के.-९ जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचे र.रु.७०,६२,४८०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वार्ड क्र.२१, बुढीलाईन-कबाडीपूरा या वॉर्डात ५०% दलित समाजाची वसाहत असुन या भागामध्ये मुलभुत सुविधांची विकास कामे झालेली नाही. मोहल्ला

किलेअर्क पंचकुआ हा भाग दलित वसाहती अंतर्गत येत आहे परंतु या भागात विकासाची कामे झालेली नसल्याने येथील मुलभूत सुविधा रस्ते, लाईट, ड्रेनेज व पाण्याची समस्या अत्यंत गंभीर झालेली आहे.

करीता, मोहल्ला किलेअर्क पंचकुआ या भागात विविध विकास कामे दलित वसाहती अंतर्गत करण्यासाठी तथा या कामासाठी अंदाजे रु.०२ कोटी ५० लक्ष रुपयाची आवश्यकता असल्याने सदरील तरतुद मान्य करून दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत काम करण्यास प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.२१ येथील मोहल्ला किलेअर्क पंचकुआ या दलित वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी रु.०२ कोटी ५० लक्षचा निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५८ येथील मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|
| SCR-Ward-3<br>P-No.19<br>S.NO.16 | वॉर्ड क्र.५८, गल्ली नं.१,२,३,४, रहिम नगर, बारी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे.<br>आर्थीक तरतुद रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.५८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |

**सुचक:-**श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफिक पठाण

**अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी, श्री.विकास प्रकाश एडके

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५८ येथे मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|
| SCR-Ward-3<br>P-No.19<br>S.NO.16 | वॉर्ड क्र.५८, गल्ली नं.१,२,३,४, रहिम नगर, बारी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे.<br>आर्थीक तरतुद रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.५८ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे या कामासाठी तरतुद वळती करण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३२८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर हा वॉर्ड दलित वस्ती असलेला वॉर्ड असून सदर वॉर्डात ७०% दलित राहतात. गेल्या २० वर्षापासून ही वस्ती विकास कामांपासून वंचित आहे. करीता ह्या भागाचा सर्वांगीन विकास होण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतुन निधी

प्राप्त करणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव मंजुर करून पाठवणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर भागात विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | १.५० कोटी |
| २ | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर भागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ५०.०० लक्ष |
| ३ | वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर भागात विविध विकास कामे करणे. | ०१.०० कोटी |

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५, बौध्दनगर या दलित वसाहतीमध्ये विविध विकास कामे करण्या करीता शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रु.०३ कोटीचा निधी मिळण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर हा वॉर्ड दलित वस्ती असलेला वॉर्ड असून सदर वॉर्डात ७०% दलित राहतात. गेल्या २० वर्षापासून ही वस्ती विकास कामांपासून वंचित आहे. करीता ह्या भागाचा सर्वांगीन विकास होण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतुन निधी प्राप्त करणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव मंजुर करून पाठवणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉक्रेटीकरण करणे. (र.रु.२ कोटी).
२. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (र.रु.१ कोटी).

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैर
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर या दलित वस्तीमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध विकास कामे करण्याकरीता र.रु.०३ कोटीचा निधी मिळण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १८.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.१२०४, वॉर्ड क्र.१४, पडेगाव माजी सैनिक कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्त करून बदलणे (र.रु.३०.०० लक्ष) या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे. परंतु नागरीकांचे सोईसाठी सदर कामाऐवजी वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथील जुनी ड्रेनेज लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे व पश्चिमेकडील नाल्यातील मुख्य सिव्हर लाईनला जोडणे हे काम करणे आवश्यक आहे.

| मंजुर कामाचे नाव | दुरुस्ती करावयाचे कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| वॉर्ड क्र.१४, पडेगाव माजी सैनिक कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्त करून बदलणे. | वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथील जुनी ड्रेनेज लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे व पश्चिमेकडील नाल्यातील मुख्य सिव्हर लाईनला जोडणे | ३०.०० लक्ष |

करीता, दुरुस्ती प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १८.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.१२०४ नुसार वॉर्ड क्र.१४, पडेगाव माजी सैनिक कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन दुरुस्त करून बदलणे (र.रु.३० लक्ष) या कामाऐवजी वॉर्ड क्र.१४, पडेगांव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथील जुनी ड्रेनेज लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे व पश्चिमेकडील नाल्यातील मुख्य सिव्हर लाईनला जोडणेच्या कामासाठी (र.रु.३० लक्ष) च्या लेखाशिर्ष बदलाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील समाविष्ट कामांचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम लाखात | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.८४ अंतर्गत श्री.डॉ पालस्टे यांच्या दवाखान्यापासून ते मुख्य रोड ते नाल्यापर्यंत सांडपाणी जाण्यासाठी नाली तयार करणे. GBR/WA-06/Page No.48 अ.क्र.०२ | २५.०० | वॉर्ड क्र.८४ अंतर्गत सारा कॉम्प्लेक्स, सारा गार्डन, कासलीवाल अंतर्गत सिमेंट रस्ते तयार करणे. | २५.०० |

**सुचक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८४ येथे सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम लाखात | सुधारित काम | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.८४ अंतर्गत श्री.डॉ पालस्टे यांच्या दवाखान्यापासून ते मुख्य रोड ते नाल्यापर्यंत सांडपाणी जाण्यासाठी नाली तयार करणे. GBR/WA-06/Page No.48 अ.क्र.०२ | २५.०० | वॉर्ड क्र.८४ अंतर्गत सारा कॉम्प्लेक्स, सारा गार्डन, कासलीवाल अंतर्गत सिमेंट रस्ते तयार करणे. | २५.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ मधील कामांचे लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| GBR | १३ | वॉर्ड क्र.१३ अंतर्गत | १) वॉर्ड क्र.१३ अंतर्गत भीमनगर उत्तर, भावसिंगपुरा, |

| | | | |
|---|---|---|---|
उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल.

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम, ते अस्तित्वात असे तो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

(२) पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात व गोळा करण्यात येईल.

१२. **विशेष सवलती** :-

१२.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

१२.२ तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

१२.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील

त्यांना सन २०१८-१९ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |

जुन ६%

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

१२.४. **आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या** मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

१२.५ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

१३. **<u>कर आकारणी प्रणाली</u>** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | **सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी.** | **सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी.** |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

**१४. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-निवासी इमारत**

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

**(सन २०१७-१८)**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

<u>निवासेतर इमारत</u>

**१४.३ (अ) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

<u>अनुदानीत शैक्षणिक संस्था</u>

**१४.५ (ब) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

**कायम विना अनुदानीत संस्था**

**१४.७ (क) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**व्यावसायीक इमारती**

**१४.०९ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१७-१८ साठी प्रचलीत दर | सन २०१८-१९ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| **अ.क्र.** | **मोकळया जागेचा प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१७-२०१८ साठी प्रचलीत दर व सन २०१८-१९ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१६-१७ साठी प्रचलीत दर | सन २०१७-१८ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १० % |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर/व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष-- | ५०० प्रती वर्ष---- |

**१६ शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१८-१९ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने, मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक ०७/०२/२०१८ रोजीच्या स्थायी समिती सभेपुढे विषय क्रमांक २७४ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, प्रशासनाने जी दरवाढ सादर केलेली आहे, ती दरवाढ रद्द करण्यात येऊन सन २०१७-१८ साठी असलेलेच दर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी लागू राहतील, असे सर्वानुमते ठरले त्यानुसार प्रस्तुत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

त्यानुसार दिनांक १९/०३/२०१८ च्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळीचा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत असून दिनांक ०७/०२/२०१८ रोजी मा.स्थायी समिती सभेत ठरल्याप्रमाणे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दरामध्ये कोणताही बदल करण्यात आला नसून तेच दर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी लागू राहतील. तसेच या ठरावाची अमंलबजावणी करताना खालील प्रमाणे दुरूस्ती ग्राह्य धरण्यात यावी.

१. जे नागरीक ऑनलाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना सामान्य करात १टक्के सूट ऐवजी ५ टक्के सूट मान्य करण्यात येते.
२. शैक्षणिक संस्थाचे बाबतीत मा. सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.५१०/ई दिनांक ०७/०२/२०१४ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.
३. आजी-माजी सैनिक व स्वातंत्र सैनिकांना व त्यांचे पत्नीचे नावे असलेले एका निवासी मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सूट देय राहील व ही सूट संबधित मिळकतधारक हयात असे पर्यंत लागू राहील. त्यासाठी प्रत्येक वर्षी वार्ड कार्यालयाकडून मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.
४. समूहगृह योजना तसेच एकाच प्रकारचे फ्लॅट/ईमारती यांना या सर्व ईमारतींना सारखाच मालमत्ता कर आकारण्यात यावा. एकाच योजनेत वेगवेगळ्या फ्लॅटधारकांना वेगवेगळी आकारणी करण्यात येवू नये.

व्यावसायीक ईमारतीमध्ये ए.सी./प्लॉन्ट व मशिनरीची जागा असल्यास त्याचे कर योग्य मूल्य निवासी दराने करण्यात यावे.

व्यावसायीक ईमारतीत ईमारत मालक/भोगवटा धारक वाहनतळाचा उपयोग व्यावसायीक स्वरुपात करत असेल तर अशा पार्कींग/वाहनतळास निवासेत्तर दराने कर आकारणीत करण्यात यावी व त्यासाठी फक्त निवासेत्तर दराने (३७.५ टक्के) दराने सामान्य कर हा मालमत्ता कर म्हणून आकारण्यात यावा. त्यावर इतर कर आकारण्यात येवू नये.

वादग्रस्त व व्यावसायीक प्रकरणामध्ये वार्ड अधिकारी, विधी सल्लागार, कर निर्धारक व संकलक, मुख्य लेखा परिक्षक अथवा अतिरिक्त आयुक्त यांना प्रकरण Out of court settlement करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

काही प्रकरणात वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहतील.

दुहेरी नोंद/तिहेरी नोंद आढळल्यास ते रद्द करण्याचे अधिकार वॉर्ड अधिकारी यांना राहील.

तसेच नामांतर प्रकरणे अंतिम करण्याचे अधिकार संबंधित वॉर्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाचे इमारतींना सर्व्हीस चार्जची आकारणी मालमत्ता कराच्या ७५ टक्के ऐवजी ५० टक्के व ३३ टक्के दराने आकारणीस मान्यता देण्याच्या दुरूस्तीसह ठरावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३५३:-</u>**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासन निर्णय क्र.नियोजन विभाग क्र.एनयुएलएम-2017/प्र.क्र.4/नवि-20, मंत्रालय, मुंबई 32, दिनांक 12-06-2017 अन्वये स्थानिक संस्था आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण व सक्षम होण्याकरीता मालमत्ता कराची वसूली 90 टक्के होणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्र./मनपा/कनिवसं/125/2017 दिनांक 16-06-2017 अन्वये मालमत्ता कर वसूली संदर्भाने “अभय योजना” राबविण्यासाठी शासनाची मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला असता अद्याप त्यास मंजुरी मिळालेली नाही.

**प्रस्ताव :-**

संदर्भीय शासन निर्णयानुसार स्थानिक संस्था आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण व सक्षम होण्याकरीता मालमत्ता कराची वसूली ९०% होणे बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची मागील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची मागणी ३६७ कोटी व उद्दीष्ट २३० कोटी ठेवण्यात आले होते. त्यापैकी ८९.३५ कोटी वसूली झाली आहे. मागील वर्षाचा अनुभव पाहता मालमत्ता कर वसूलीचे प्रमाण अत्यल्प आहे. मालमत्ता कर वसूल न होण्यामागे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये लागू करण्यात आलेली शास्ती, न्यायालयीन प्रकरणे, मोठे थकबाकीदारांची संख्या व अपूरा कर्मचारी वर्ग असल्याचे दिसुन येते.

सन २०१७-१८ या वर्षासाठी थकबाकी रक्कम रू.२२२.१६ कोटी असून त्यावर विलंब शुल्क २५.३४ कोटी व अदत्त शास्ती ९५.४६ कोटी अशी एकूण १२०.८० कोटी शास्तीची रक्कम आहे. तसेच चालु वर्षाची मागणी रू.९०.१० कोटी आहे.

मालमत्ता करावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूचि ‘ड’ मधील कराधान नियम प्रकरण-८ मधील नियम ४१ अन्वये शास्ती आकारण्यात येते. सदरील शास्ती भरण्यासाठी नागरिकांचा विरोध असल्याने मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७४६ दिनांक २१-२-२०१५ अन्वये शास्ती / दंड पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, व्याज माफी/शास्ती माफी रद्द केल्यास महानगरपालिकेचे २२ ते २५ कोटी रूपयाचे मोठे आर्थिक नुकसान होईल. तसेच करधारकांना मालमत्ता कर वेळेवर

भरण्याची आवश्यकता नाही, असा संदेश जाईल. असे तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांचे मत झाल्यामुळे सदरील ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ अन्वये महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेवुन रद्द करण्यात यावा, यासाठी मा.सचिव, नगर विकास विभाग, नवि-२४, मंत्रालय, मुंबई यांना जा.क्र./मनपा/कनिवसं/६४२/२०१५ दिनांक १९-०८-२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला आहे.

तथापि, औरंगाबाद शहरातील नागरिकांची शास्ती न भरण्याची मानसिकता तसेच अनाधिकृतपणे विकसीत झालेला बहुतांश भाग व त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६७ अन्वये आकारण्यात येणारा दुप्पट कर यामुळे नागरिक मालमत्ता कर भरण्यासाठी अत्यंत उदासिनता दर्शवित आहे. संदर्भीय दिनांक १२-०६-२०१७ चे शासन निर्णयानुसार ९०% वसूली प्रभावीपणे करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील कराधान नियमांचे नियम ४१ अन्वये आकारण्यात येणाऱ्या शास्तीमध्ये शासनाचे मान्यतेने सवलत देवुन मालमत्ता कर वसूलीसाठी विशेष अभय योजना राबविणे, असा औरंगाबाद महानगरपालिकेचा मानस आहे.

**अ)** आकारण्यात आलेल्या २% शास्ती व विलंब शुल्क रकमेवर ७५% सवलत :-

| **दि.३१-३-२०१७ पर्यंतची निव्वळ थकबाकी** | **त्यावरील विलंब शुल्क व शास्ती** | **एकूण थकबाकी** | **शास्तीत ७५ % सूट दिल्यास शास्तीची कमी होणारी रक्कम** | **प्रत्यक्ष जमा होणारा अपेक्षित मालमत्ता कर** |
|---|---|---|---|---|
| रू.२२२.१६ कोटी | रू.१२०.८० कोटी | रू.३४२.९६ कोटी | रू.९०.६० कोटी | रू.२५२.३६ कोटी |

मिळकतकराची थकीत रक्कम वसूल करणेसाठी थकबाकी असलेल्या सर्व मिळकतीवरील संपूर्ण रक्कम थकबाकीसह दिनांक ३१-०३-२०१८ पर्यंत एक रकमी भरल्यास भरण्याच्या दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या विलंब शुल्क व २% शास्ती रकमेच्या ७५% शास्ती रकमेस माफी देणेस अभय योजना जाहीर करणेसाठी आयुक्त, महानगरपालिका यांना अभय योजना जाहीर करणेसाठी मान्यता मिळणे योग्य होईल.

करीता, मालमत्ता कराची प्रभावीपणे वसूली होणेसाठी वरील प्रमाणे अभय योजनेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येत असून दिनांक ३१-०३-२०१८ पर्यंत सदर अभय योजना राबविल्यास नागरीकांना कर भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळून वसूली मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. अशा प्रकारची अभय योजना यापूर्वी पूणे महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आली होती.

तथापि, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१४०/नवि-२० दिनांक २४-११-२०१७ चा शासन निर्णय प्राप्त झाला आहे, तो पुढील प्रमाणे.

**शासन निर्णय :-**

लोकलेखा समितीच्या 2015-16 च्या 13 वी महाराष्ट्र विधानसभेच्या आठव्या अहवालान्वये खुल्या भुखंडावरील कराची वसूली व दंडात्मक व्याज आकारण्याबाबत सर्व महानगरपालिकांना उचित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची शिफारस केली आहे. तसेच खुल्या भुखंडावरील कराची वसूली व थकीत देयकावरील शास्ती आकारण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्याअनुषंगाने खुल्या भुखंडावरील कराची वसूली व थकीत देयकावरील शास्तीबाबत कार्यवाहीच्या सूचना निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 129 (1) (अ) सह 2(49) नुसार महानगरपालिकेस जमीन व इमारतीवर मालमत्ता कर आकारण्याचा अधिकार आहे.
2. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूचि "घ" मधील प्रकरण 8 (कराधान नियम) मधील नियम 41 नुसार मालमत्ता कराच्या थकीत देयकावर शास्ती आकारण्याची तरतुद करण्यात आली आहे.
3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील वरील तरतुदींची सर्व नियोजन प्राधिकरणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
4. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्राच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक 201711241211084925 असा आहे.

हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

तथापि, दिनांक 7-2-2018 रोजी मा.स्थायी समिती सभेत मालमत्ता कर पाणीपट्टी संदर्भाने मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली असून त्याअनुषंगाने अभय योजने संदर्भाने प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

मा.महापौर :सदर अभय योजनेस दि.३१ मे २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येते. या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासनाने सादर केलेला अभय योजनेचा प्रस्ताव व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग-२० यांचा दिनांक २४-११-२०१७ चा शासन निर्णय विचारात घेवुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने व मालमत्ता कर हे प्रकरणाचे एकमेव प्रमुख स्त्रोत असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये मालमत्ता कराचे दर निश्चित करण्याचे अधिकार महानगरपालिका सर्वसाधारण सभेस असून महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असल्याने पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर अभय योजना दिनांक ०१ एप्रिल २०१८ पासुन ते ३१ मे २०१८ या दोन महिन्याच्या कालावधीत राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून या कालावधीत मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता करात दोन टक्के आकारण्यात येणाऱ्या शास्तीमध्ये व विलंब शुल्कामध्ये ७५ टक्के सुट

देण्यात यावी. सदर योजनेची प्रसिध्दी व अमंलबजावणीसाठी लागणाऱ्या खर्चास देखील मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतीत प्रशासनाने त्वरीत वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन देवुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी द्यावी. तसेच महानगरपालिकेच्या वेबसाईटवर मालमत्ताधारकांची यादी (सन २०१८-१९ चे मालमत्ता करासंदर्भाने) प्रसिध्दी करावी. तथापि, याबाबतीत शासनास माहितीस्तव अवगत करण्यात यावे.

सदर अभय योजना अमंलबजावणी करताना काही अडचणी निर्माण झाल्यास त्या अंतिम करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रदान करण्यात येत आहेत. दुरूस्तीसह ठरावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**टिप:-** क्रमांक-३५४ हा विषय क्रमांक-३१९ च्या महाराष्ट्र स्वच्छ अभियान संदर्भात टिपणी अहवालास दिलेला आहे.

**विषय क्रमांक ३५५:-** **(कार्य.अभि.१,२,३ व ७)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, MIDC चिकलठाणा येथील लिपी बॉयलर कंपनी ते CTR कंपनी ते W सेक्टर ते मेमन फर्नेस व मसनतपूर मेन रोड ते शक्ती टाईल्स शहानगर येथील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुची नुसार र.रु.२,९८,०४,३५६/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१७-२०१८ मधील लेखाशिर्ष शहर एकात्मिक रस्ते विकास योजना चिकलठाणा MIDC अंतर्गत रस्ते विकसीत करणे प्रस्तावित आहे. सदरील कामास दिनांक १९.०१.२०१८ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.२,९८,०४,३५६/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, MIDC चिकलठाणा येथील लिपी बॉयलर कंपनी ते CTR कंपनी ते W सेक्टर ते मेमन फर्नेस व मसनतपूर मेन रोड ते शक्ती टाईल्स शहानगर येथील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाच्या र.रु.२,९८,०४,३५६/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३५६:-** **(कार्य.अभि.१,२,३ व ७)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७, चौधरी कॉलनी अंतर्गत चिकलठाणा जालना रोड औरंगाबाद येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय इमारतीचे बांधकाम झालेले आहे व नवनिर्मित जिल्हा रुग्णालय लवकरच सुरू होणार आहे. डॉ.जी.एम.गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय औरंगाबाद यांनी यापुर्वी ४ इंची व्यासाची नळ जोडणी मागणी केलेली होती. त्यानुसार त्यांच्या मागणीनुसार ४ इंची नळ जोडणीस मंजुरी देऊन पाणीपुरवठा यापुर्वीच सुरु करण्यात आलेला आहे. परंतु सदर ४ इंची नळ जोडणीद्वारे होणारा पाणीपुरवठा अल्प प्रमाणात व तीन दिवसाआड पाणी वितरण असल्याने पाणी पुरवठा पुरेसा होत नाही. संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक औरंगाबाद यांनी पुन्हा सदर जिल्हा रुग्णालयास रोज २.० लक्ष लीटर पाणी लागणार आहे व तशी मागणी केलेली आहे.

तेव्हा अस्तित्वातील जलवाहिनीद्वारे २.० लक्ष लीटर पाणी पुरवठा करता येणे शक्य नसल्याने संबंधीत शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद यांना एन-५ जलकुंभ ते चिकलठाणा जिल्हा रुग्णालयापर्यंत २०० मी.मी.व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकण्यासाठी वेळोवेळी पत्र देऊन

कळविले आहे. त्यासोबत सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,८७,१६,९७१/- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०१६-१७च्या दरसुचीनूसार बनविलेले आहे. व सदर अंदाजपत्रक र.रु.१,८७,१६,९७१/- महानगरपालिकेकडे वर्ग केल्यानंतर पुढील काम करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. असे कळविलेले होते. सदरच्या मुळ अंदाजपत्रकामध्ये मनपा सुपरव्हिजन चार्जेस तसेच खुल्या बाजारातील पाईपचे वाढीव दर बघता सद्या निविदा अंदाजपत्रकापेक्षा ३०% जास्त दराने येत असल्याने त्यामध्ये त्याचा देखील समावेश करण्यात आलो आहे. असा एकूण अंदाजपत्रक र.रु.१,८७,१६,९७१/- चे प्रस्ताव संबंधीत डॉ.जी.एम.गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांना यापुर्वी जा.क्र.३५३/२०१७ दिनांक २९.११.२०१७ नुसार जा.क्र.३६३/२०१८ दि.०४.०१.२०१८ अंदाजपत्रकाचा निधी प्राप्त होण्यासाठी कळविले आहे.

उक्त बाबींचा विचार करता, डॉ.जी.एम.गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र./१८५०-५७ दि.०५.०२.२०१८ रोजी महानगरपालिकेस पत्र देऊन कळविले आहे की, नवनिर्मीत २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद या रुग्णालयास स्वतंत्र पाईप लाईन टाकण्याकरीता अंदाजपत्रक र.रु.१,८७,१६,९७१/- एवढा निधी देण्यात येणार असल्याचे मा.ना.डॉ.दिपकजी सावंत साहेब, मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण तथा पालकमंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये सांगितले आहे. तसेच अटी व शर्ती बाबत शासनाकडून मान्यता देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच स्वतंत्र पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहे.

प्रत्यक्ष काम करतांना कळविण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा जास्त खर्च लागल्यास ती रक्कम महानगरपालिकेकडे तात्काळ जमा करण्यात येईल. निविदा मागविल्यानंतर जर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचे आल्यास/मंजुर झाल्यास आपणाकडून कळविण्यात आलेली रक्कम आणि प्रत्यक्ष मंजुर निविदा रक्कम यातील फरकाची रक्कम महानगरपालिकेस भरण्यात येईल तसेच रस्ता खोदकाम करावे लागल्यास रस्ता दुरूस्ती रक्कम देखील महानगरपालिकेकडे भरण्यात येईल.

तरी मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा रुग्णालय औरंगाबाद करीता स्वतंत्र पाईप लाईन टाकण्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे. त्याबाबतचा निधी त्यांच्या कार्यालयास लवकरच प्राप्त होणार असून निधी प्राप्त झाल्यानंतर लगेचच महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात येईल. याची हमी डॉ.जी.एम.गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबाद यांनी दिलेली आहे.

उक्त बाबींचा विचार करता २०० मीमी व्यासाची डी.आय.क्र.-७ जलवाहिनी एन-५ जलकुंभ ते चिकलठाणा, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद पर्यंत टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.१,८७,१६,९७१/- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०१६-१७ च्या दरसुचीनूसार तयार करण्यात आलेले आहे. सदर कामासाठ लागणारी तरतुद ही उक्तप्रमाणे शासन निधी प्राप्त झाल्यानंतर करण्यात येईल.

करीता, वॉर्ड क्रमांक-३७ चौधरी कॉलनी अंतर्गत, जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद यासाठी २०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रु.१,८७,१६,९७१/- मंजुरी बाबत व निधी उपलब्ध झाल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल. अशी अट टाकून निविदा मागविण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक-३७ चौधरी कॉलनी अंतर्गत, जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद यासाठी २०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे रु.१,८७,१६,९७१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच निधी उपलब्ध झाल्यानंतर कार्यादेश देण्यात येईल. अशी अट टाकून निविदा मागविण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३५७:-** **(कार्य.अभि.१,२,३ व ७)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई हायवे पासून ते कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार र.रु.८०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाचा खर्च प्रो-पुअर बजेट या लेखाशिर्षाअंतर्गत ए.डी.एम.नवीन कामे पान क्र.२, अ.क्र.०४ वर उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रु.८०,००,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई हायवे पासून ते कत्तलखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रु.८०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३५८:-**

**(कार्य.अभि.१,२,३ व ७)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भीमनगर, भावसिंगपुरा दक्षिण अंतर्गत मुख्य रस्त्याचे White Topping करणे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार र.रु.७४,९९,९८३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाचा खर्च मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले र.रु.७४,९९,९८३/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भीमनगर, भावसिंगपुरा दक्षिण अंतर्गत मुख्य रस्त्याचे White Topping करणेच्या कामासाठी र.रु.७४,९९,९८३/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**टिप:-**विषय क्रमांक-३५९ हा दिनांक १५.०२.२०१८ रोजीच्या सभेत ऐनवेळी मंजुर करण्यात आलेला आहे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद